# गुप्तकालीन प्रशासनव्यवस्था

गुप्तकाळाला प्राचीन भारताच्या इतिहासातील सुवर्णयुग म्हणतात. गुप्त घराण्याची स्थापना होण्यापूर्वी या देशावर इंडो-ग्रीक, शक, पल्लव, कुशाण इ. परकीयांनी आक्रमणे करून या देशाची राजकीय आणि सांस्कृतिक एकता धोक्यात आणली होती. गुप्तांनी प्रथम या देशातील लहान लहान राज्यांनी जिंकून विशाल साम्राज्य निर्माण केले व या देशात राजकीय एकता निर्माण केली. परकीय आक्रमणांपासून देशाचे संरक्षण करून त्यांनी या देशात सांस्कृतिक एकता निर्माण करण्याचाही प्रयत्न केला. गुप्तांच्या पूर्वी ज्या सत्तांनी भारतात राज्य केले होते त्यांच्या प्रशासनपद्धतीत थोडाफार बदल करून गुप्तांनी स्वीकारली. गुप्तांच्या शासनपद्धतीत नवीन काहीच नसून परंपरेने चालत आलेली शासनपद्धतीच गुप्तांनी राबविली असा आरोप काही इतिहासकार करतात. त्यातील तथ्य मान्य करूनही परंपरेने चालत आलेल्या शासनपद्धतीला गुप्तांनी सोयीस्कर वळण दिले व एका प्रचंड साम्राज्याची निर्मिती करून त्याचा प्रशासन कारभार प्रभावी रीतीने हाताळला हे सत्य नाकारता येत नाही. प्रशासनाच्या सोयीसाठी गुप्तसाम्राज्याचे पुढीलप्रमाणे विभाग करण्यात आले होते.

१) गुप्तांच्या प्रत्यक्ष अंमलाखाली असलेला प्रदेश.

२) गुप्तांच्या प्रभावाखालील असलेली गणराज्ये

३) आर्यावर्त, मध्य प्रदेश येथील सामंत राजे.

४) गुप्तांची प्रभुसत्ता मान्य केलेली मांडलिक राज्ये.

५) गुप्तांच्या अधिसत्तेखालील सीमावर्ती राज्ये आणि

६) गुप्तांची अधिसत्ता मान्य असलेली पण स्वतंत्र मित्र राज्ये

गुप्तांनी प्रशासनाचे ५ भाग केले होते.

१) केंद्रीय प्रशासन २) प्रांतीय प्रशासन ३) जिल्हा प्रशासन ४) नगर प्रशासन आणि ५) ग्रामप्रशासन.

**१) केंद्रीय प्रशासन**

**राजा** –

गुप्तप्रशासन हे राजतंत्रात्मक होते. राजा हा सर्वोच्च शासनप्रमुख असे. त्याच्या ती अगद अधिकार होते. तो परमेश्वराचा अंश आहे अशी श्रद्धा होती. अलाहबाद प्रशस्तीमध्ये समुद्रगुप्तला पृथ्वीवर निवास करण्यासाठी आलेली देवता म्हटले आहे. राजा हा लौकिक क्रियाकलापांपुरताच मनुष्य होता व इतर सर्व साठी तो ईश्वरतुल्य होता. गुप्तराजे परगभागवत, परमदैवत, महाराजाधिराज, एकाधिराज, परमेश्वर, चक्रवर्ती इ. उपाधी धारण करीत. अलाहाबाद प्रशस्तीमध्ये समुद्रगुप्तला कुबेर, वरुण, इंद्र इ. नावांनी संबोधिले आहे. राजा हा परमेश्वरी अंश आहे ही गुप्त राजाची धारणा असली तरी ते स्वेच्छाचारी नव्हते. स्मृतिगंधात म्हटले आहे की, "एका श्रेष्ठ राजाने लोककल्याणाची कामे करून प्रवेच्या सदिच्छा अर्जित केल्या पाहिजेत. "राजा हा वंशपरंपरेने गादीवर येत असे. सामन्यतः ज्येष्ठ मुलाला गादी मिळत असे. कधीकधी सम्राट स्वतःच्या हयातीतच स्वतःच्या सर्वोत्तम मुलाला युवराज घोषित करीत असे ज्येष्ठ मुलगा राज्यकारभार करण्यास अयोग्य असल्यास लहान मुलाला गादीवर बसविल्याची उदाहरणे आढळतात.राजाच्या हाती सर्वोच्च सत्ता केंद्रित असली तरी राजा निरनिराळ् मंत्री, अधिकारी यांच्या सल्ल्याने राज्यकारभार करीत असे राजाला गादीवर टिकून राहण्यासाठी प्रजेची सदिच्छा प्राप्त करणे आवश्यक असे ही सदिच्छा व लोकप्रियता राजा जनताभिमुख कार्यक्रमाद्वारे प्राप्त करीत असे.

**मंत्रिपरिषद**

राजाला प्रशासनाच्या कार्यात मदत करण्यासाठी मंत्रिपरिषद असे. मंत्र्यांची नेमणूक राजा स्वतः करीत असे. मंत्री त्यांच्याकडे सोपविण्यात आलेल्या खात्याचा कारभार पाहत कालिदासाच्या मते 'कंचुकी' नावाचा अधिकारी मंत्रिपरिषदेचा निर्णय राजाला कळवित असे. परंतु प्रशासनांतर्गत कोणताही निर्णय घेण्याचा अंतिम अधिकार राजाचा असून तो मंत्रिपरिषदेवर बंधनकारक राहत असे. कालिदासाच्या मते गुप्तप्रशासनात तीन प्रकारचे मंत्री होते. परराष्ट्रमंत्री, वित्तमंत्री आणि विधिमंत्री हे मंत्री उच्चकुलीन, सुशिक्षित, सत्यवचनी, न्यायी, निःस्वार्थी व त्यांना सोपविण्यात आलेल्या कार्यात तज्ज्ञ असणे आवश्यक असे. केंद्रीय खाती – केंद्रात पुढीलप्रमाणे खाती, विभाग किंवा अधिकारपदे होती. त्यांना 'अधिकरण' असे म्हणत.

**१) महासेनापती -** सीमावर्ती राज्यांच्या सुरक्षिततेसाठी हे पद निर्माण करण्यात आले होते. सैन्यातील हे सर्वोच्च पद असून सीमावर्ती प्रांतांतील सैन्याचे युद्धप्रसंगी संचलन करणे ही महासेनापतीची जबाबदारी असे.**२) महादंडनायक-** महासेनापतीच्या हाताखाली काही महादंडनायक असत. महादंडनायकाच्या हाताखाली काही गजपती, अश्वपती व इतर लष्करी अधिकारी असत. महादंडनायक युद्धाच्या वेळी सैन्याचे नेतृत्व करीत. युद्धाव्यतिरिक्त काळात यांना न्यायदानाचेही काम करावे लागे.

**३) रणभांडारिक-** सैन्याला शस्त्रात्रे, धान्य, कपडे, औषधी इ. युद्धविषयक साहित्य पुरविणे हे या अधिकाऱ्यांचे काम असे.

**४) महाबलाधिकृत**

युद्धाच्या वेळी व्यूहरचना करणे, छावणी उभारणे इ. याची कामे असत. याच्या हाताखाली 'अधिकृत' नावाचे अधिकारी असत.

५) दंडपाशिक- पोलिस खात्यातील हा सर्वोच्च अधिकारी असे. याच्या हाताखाली गुप्तचर विभागातील 'चौरोद्धरणिक' आणि दूत नावाचे अधिकारी असत.

६) महासंधीविग्रहक - परराष्ट्र खात्यासारखे याचे काम असे शेजारील राज्यांशी संबंध ठेवणे, ते संबंध कसे असावेत याबाबत राजाला सल्ला देणे इ. याची कामे असत. याच्या कार्यक्षमतेवर राज्याच्या परराष्ट्र धोरणाचे यशापयश अवलंबून असे.यामुळे या पदावर अत्यंत लायक व्यक्तीची नेमणूक केली जाई हरिषेण हा समुद्रगुप्तचा महासंधीविग्रहक होता.

७) महाभांडाराधिकृत हा राज्याचा कोषाध्यक्ष होता.

८) विनयस्थितीस्थापक हा धार्मिक खात्याचा प्रमुख असे. राज्यात धार्मिक सद्भावना टिकविणे, प्रजेत आचरण शुद्धता राखणे, प्रजेकडून धर्म व परंपरा यांचे पालन व्हावे म्हणून प्रयत्नशील राहणे इ. याची कामे असत.

९) महापक्षपटलिक - राज्यात वेळोवेळी काढण्यात आलेल्या राजाज्ञा आणि इतर अधिकाऱ्याच्या आदेशांची सरकारदप्तरी नोंद ठेवणे तसेच राज्याचे उत्पन्न व खर्च यांची नोंद ठेवणे हे याचे कार्य असे.

१०) सर्वाध्यक्ष - हा साम्राज्याच्या केंद्रीय कार्यालयाचा प्रमुख असे. केंद्रसरकारच्या सर्वा खात्यांवर याची देखरेख असे. हे खाते अत्यंत महत्त्वाचे असल्याने या खात्याच्या प्रमुखपदी राजपुत्र किंवा राजपरिवारातील व्यक्तीची नेमणूक होत असे.

वरील अतिमहत्त्वाच्या खात्यांशिवाय काही कमी महत्त्वाची खाती पुढीलप्रमाणे होती.

अ) श्र्वाधीकरण जमीन महसूल गोळा करणारा अधिकारी

ब) पुस्तपाल महापक्षपटलिक याच्या कार्यात मदत करणारे सहायक

क) गोप खेड्यातील जमीन महसूल आणि खर्चाची नोंद ठेवणारे खाते
ड) अग्रहारिक धर्मदाय खाते
इ) गौल्मिक जंगलातील उत्पन्नावर कर वसूल करणारे खाते.
फ) शालिक भूमिकर वसुली खाते
ग) कर्णिक जमीन, घरे, मालमत्ता इ. ची नोंदणी करणारे खाते.

याशिवाय राजमहालाची देखरेख करण्यासाठी महाप्रतिहार आणि प्रतिहार नेमले जात युवराज युवराजभट्टारक या पदांवर राजघराण्यातील व्यक्तीचीच निवड के जाई

**अधिकाऱ्यांचे वेतन –**

अधिकाऱ्यांना दोन स्वरूपात वेतन दिले जाई. एक जमिनीच्या मोबदल्यात आणि दुसरे रोख रकमेच्या स्वरूपात वेतनाच्या मोबदल्यात दिल्या जाणाऱ्या जमिनीतून जे उत्पन्न होई ते त्या अधिकाऱ्याला मिळत असे त्याच्या मृतरी जमीन सरकारजमा होई -

**२) प्रांतीय प्रशासन**

प्रशासनाच्या सोयीसाठी गुप्तसाम्राज्याचे निरनिराळ्या प्रांतांत विभाजन केले जाई. 'या प्रांतांना 'देश' किया 'भुक्ती' म्हणत गुप्त साम्राज्यात किती देश किवा भुक्ती होते याची निश्चित आकडेवारी उपलब्ध नाही. मंदसोर, पांचाल, मगध कौशांबी, कोसल, काशी इ. काही देशाची (प्रांतांची) नावे आढळतात देश किंवा भुक्तिप्रमुखाला 'उपरिक म्हणत त्यांची नेमणूक सम्राट करीत असे उपरिकाने पद हे प्रांतीय राज्यपाल किंवा प्रांताध्यक्षासारखे असे या पदी सामान्यतः राजपुत्राचीच नेमणूक होत असे. अपवादात्मक परिस्थितीतच इतर व्यक्तींची या पदावर नियुक्ती केली जाई उपरिकाचे मुख्य कर्तव्य भुक्तीचे अंतर्गत बंडाळ्या व परकीय शत्रूपासून रक्षण करणे तसेच भुक्तीमध्ये कायदा आणि सुव्यवस्था टिकविणे हे होते. भुक्तीमध्ये रस्ते, कालवे, धर्मशाळा, दवाखाने इ बांधणे हे याचे काम असे उपरिकाचा कार्यकाळ हा सामान्यपणे पाच वर्षांचा असे उपरिकाला प्रांतीय प्रशासनात मदत करण्यासाठी अनेक अधिकारी असत. 'मल्लासरूल' ताम्रपयत काही अधिकाऱ्यांचा उल्लेख आढळतो जसे कार्तक्रितिक, भोगपतिक, हिरण्य सामुधिक (नाणे विभाग अधिकारी) तदायुक्तक (कोषाध्यक्ष), औद्रांगिक (उगकर गोळा करणारा अधिकारी), अरुण स्थानिक (रेशीम उत्पादन व्यवसाय अधिकारी), अग्रहारिक (अग्रहारांचा अधीक्षक) आणि चौरोद्धरणिक (सर्वोच्च पोलिस अधिकारी), सर्व कर्ज आणि दंड वसूल करणाऱ्या अधिकाऱ्याला 'साधनिक' म्हणत या अधिकाऱ्यांच्या साहाय्याने उपरिक हा भुक्तीचा कारभार पाहत असे

**३) जिल्हा प्रशासन -**

प्रशासनात अधिक कार्यक्षमता यावी म्हणून प्रांत किंवा भुक्तीचे 'विश' (जिल्हा) मध्ये विभाजन करण्यात आले होते. सर्वसाधारणपणे एका भुक्तीमध्ये दोन किंवा तीन विश असत. विशप्रमुखाला विशपती म्हणत. त्याची नेमणूक राजाकडून होत असे. अंतरवेदी विशचा विशपती म्हणून राजाकडून सर्वनागची नेमणूक करण्यात आली होती. वैशाली येथे सापडलेल्या काही शिक्क्यांमध्ये विशपतीऐवजी कुमारामात्य हा शब्द वापरण्यात आला आहे.विशचा कारभार पाहण्यासाठी विशपतीच्या मदतीला एक परिषद असे. या परिषदेत महत्तर (ग्रामातील ज्येष्ठ व अनुभवी लोक), ग्रामिक (ग्रामप्रमुख), सौल्किक (जकात अधिकारी), गौल्मिक (जंगल व किल्ले देखरेख अधिकारी), भांडाराधिकृत (कोषाध्यक्ष), पुस्तपाल इ. अधिकारी असत.विशमध्ये शांतता आणि सुव्यवस्था टिकविणे विशपतीची जबाबदारी असे. त्याच्या जातीला दंडपाशक, दंडनायक इ. अधिकारी राहत. युक्त, आयुक्त, नियुक्त या अधिकाऱ्यांचाही उल्लेख आढळतो. ते करवसुली अधिकारी असावेत.

**४) नगरप्रशासन -**

विशचे विभाजन नगरात करण्यात आले होते. नगरप्रमुखाला पूरपाल किंवा नगररक्षक म्हणत. पूरपालची नियुक्ती विशपती करीत असे. सामान्यतः विशपतीचा मुलगाच पूरपाल राहत असे. एका नगर समितीच्या मदतीने पूरपाल नगराचा राज्यकारभार पाहत असे. नगराच्या सुरक्षिततेसाठी सभोवताली खंदक असे. व्यापारी, कलाकार, विद्वान इ. लोक नगरात राहत.

**५) ग्रामप्रशासन**

ग्राम किंवा खेडे हा प्रशासनाचा सर्वात लहान घटक होता. ग्रामप्रमुखाला 'ग्रामिक' म्हणत. ग्रामात शांतता व सुव्यवस्था राखणे ही त्याची जबाबदारी असे. त्याला प्रशासनात मदत करण्यासाठी पंचमंडळी किंवा जनपद नावाची समिती असे. याशिवाय दूत, सीमाकर्मकार, लेखक, दंडिक इ. अधिकारी असत. करवसुली, अल्पसंख्यांकांच्या हितसंबंधाचे संरक्षण, ग्रामातील विवाद मिटविणे, शांतता व सुव्यवस्था निर्माण करणे हे ग्रामपंचायत किंवा पंचमंडळींचे काम असे.

**न्यायव्यवस्था-**

गुप्तकालीन न्यायव्यवस्था ही तुलनात्मकदृष्ट्या समाधानकारक होती सम्राट हा साम्राज्याचा सर्वोच्च न्यायाधीश होता. केद्र, भुक्ती आणि विश येथे स्वतंत्र न्यायालये होती. खेड्यातील न्यायदानाचे काम पंचमंडळी करीत. गुन्ह्याचे प्रमाण कमी असून न्यायदान निःपक्षपातीपणे केले जाई.फाह्यानच्या मते गुप्तकाळातील शिक्षा अतिशय सौम्य होत्या. याचा अर्थ न्यायव्यवस्था दुबळी होती असा नव्हे. गुन्ह्याच्या स्वरूपावर शिक्षेचे प्रमाण अवलंबून असे. न्यायव्यवस्था दृढ होती म्हणूनच गुन्ह्यांचे प्रमाण कमी होते.विशाखादत्तच्या मुद्राराक्षस नाटकावरून एखाद्या व्यक्तीने गंभीर स्वरूपाचा गुन्हा केल्यास तिला जाहीर रीतीने कठोर शिक्षा (अंगविच्छेद, फाशी दिली जाई. लोकामध्ये नये केल्यास त्याच्या भयंकर परिणामांची जाणीव लोकांना व्हावी हा या मागचा उद्देश होता.. गुन्हेगाराला हत्तीच्या पायाखाली तुडविण्याची शिक्षा या काळात दिली जाई. अर्थपाल नावाच्या व्यक्तीला चोरी केल्याबद्दल ही शिक्षा देण्यात आली होती असे विशाखादत्तने नमूद करून ठेवले आहे. स्वतःचे निरपराधित्व सिद्ध करण्यासाठी गुन्हेगाराला अग्निदिन, जलदिव्य इ. परीक्षांना तोंड द्यावे लागे. यावरून गुप्तकाळात गुन्हेगारांना कठोर शासन केले जाई हे दिसून येते.

**लष्करी प्रशासन-**

विशाल साम्राज्य टिकविण्यासाठी अत्यंत शिस्तबद्ध आणि प्रशिक्षित लष्कराची आवश्यकता असते. गुप्तराजे महत्त्वाकांक्षी आणि साम्राज्यवादी होते या महत्त्वाकांक्षेच्या पूर्तीसाठी त्यांनी विशाल आणि सुसज्ज सैन्य उभारले. त्यांचे सैन्य तिरंगी असून पायदळ, घोडदळ आणि हत्तीदळ हे सैन्याचे तीन विभाग असत सैन्यात रथदळ नसावे. राजस्थान भागातील युद्धात उंटांचा वापर होत असावा समुद्रकिनाऱ्याच्या रक्षणासाठी नाविकदळ असावे. सेनापती हा सैन्याचा सर्वोच्च अधिकारी असून महादंडनायक, रणभांडारिक इ अधिकारी त्याच्या मदतीला असत.

**उत्पन्नाची साधने**

विशाल गुप्तसाम्राज्याच्या कारभारासाठी प्रचंड धनाची आवश्यकता होती. उपलब्ध पुराव्यांवरून गुप्तकाळात १८ प्रकारचे कर असल्याचे कळते परंतु त्याविषयी सविस्तर माहिती मिळत नाही. जमीन महसूल हा सर्वात महत्त्वाचा कर असून तो १६% ते २५% च्या दरम्यान आकारला जा.ई हा कर प्रामुख्याने धान्याच्या स्वरूपात गोळा केला जाई. गुप्तकाळात उत्पन्नाची साधने पुढीलप्रमाणे होती.

**१) भागकर**- यालाच जमीन महसूल म्हणतात हा उत्पन्नाच्या १६ % ते आकारला जाई

**२) भोजकर**- हा चुंगीकर असून आयात-निर्यात मालावर आकारला जाई.

**३) शुल्ककर**- हा व्यापारी आणि कलाकारांवर आकारला जाई.

**४) भुतोवात प्रत्याय**- परदेशातून गुप्तसाम्राज्यात आयात होणाऱ्या वस्तूंवर हा कर आकारला जाई. याशिवाय जंगले, खाणी, कुरणे ही देखील उत्पन्नाची साधने होती. वाकाटकांच्या एका आलेखानुसार गाय, बैल, दूध, तूप, मध, मादक द्रव्ये यांच्यावरही कर लावला जाई. युद्धकाळात अतिरिक्त कर लादले जात युद्धापासून मिळालेली लूट, खंडणी हेही राज्याच्या उत्पन्नाचे साधन असे.

**अंतर्गत सुरक्षितता**

विशाल साम्राज्याला परकीय शत्रुंपासून जितका धोका असतो त्याहूनही जास्त धोका अंतर्गत बंडाळयांपासून असतो. गुप्तांच्या विशाल साम्राज्यात अंतर्गत शांतता आणि सुव्यवस्था टिकविण्यासाठी 'दंडपाशारिक' नावाचा अधिकारी असे. संपूर्ण साम्राज्यात गुप्तहेरांचे जाळे पसरवून साम्राज्यात घडणाऱ्या प्रत्येक बारीकसारीक गोष्टींवर हा अधिकारी डोळयात तेल घालून लक्ष देत असे. याच्या जागरूकतेवरच साम्राज्याची अंतर्गत शांतता आणि सुव्यवस्था अवलंबून असे. या पदामुळे साम्राज्यातील गुन्हेगारीला बराच आळा बसला होता. गुप्तसाम्राज्यातील लोकांना शांततेने जीवन जगताना पाहून फाह्यानला अतिशय आश्चर्य वाटल्याचे त्याने नमूद करून ठेवले आहे.

**समाजोपयोगी कामे**

गुप्तराजे निरंकुश असले तरी लोककल्याणाची आस्था बाळगणारे होते. त्यांनी प्रजेच्या सुखसोयींकडे विशेष लक्ष पुरविले. गुप्तकाळात साम्राज्याच्या निरनिराळया भागांत रस्ते, कालवे, दवाखाने, धर्मशाळा, धर्मदाय संस्था इ. ची उभारणी करण्याचे काम मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यात आले.

वरील सर्व मुद्यांचा विचार केल्यानंतर लक्षात येईल की गुप्तांचे प्रशासन इतर शासकांच्या प्रशासनापेक्षा निश्चितच चांगले होते. म्हणूनच डॉ. अळतेकर आणि डॉ. स्मिथ गुप्तप्रशासनाला प्राचीन भारतातील आदर्श प्रशासन मानतात.

**गुप्तकाळ प्राचीन भारतातील सुवर्णयुग**

भारताच्या प्रदीर्घ इतिहासाला दोन सुवर्णयुगांनी सुशोभित केले आहे. पहिले सुवर्णयुग प्राचीन काळी गुप्तकाळात अवतरले तर दुसरे सुवर्णयुग मध्ययुगात शहाजहानच्या काळात अवतरले. गुप्तकाळाला सुवर्णयुग का म्हणतात हे पाहण्यापूर्वी सुवर्णयुग म्हणजे काय ते पाहणे उचित ठरेल.

सर्व धातूंमध्ये सुवर्ण ही सर्वात मौल्यवान धातू समजली जाते. या धातूचा पिवळा धम्मक रंग आणि चकाकी यामुळे प्राचीन काळापासून या धातूपासून बनविलेले अलंकार मानवी सौंदर्यात भर घालीत आहेत. आधुनिक काळ सोडला तर जगभर ज्या दोन कारणांसाठी (कनक आणि कांता) युद्धे झाली आहेत त्यापैकी एक कारण कनक म्हणजे सुवर्ण होय. सुवर्णदान हे अत्यंत पवित्र दान समजले जाते. प्राचीन काळापासून सुवर्ण हे आंतरराष्ट्रीय विनिमयाचे साधन असून आज सुवर्ण हेच संपूर्ण जगाच्या आर्थिक व्यवस्थेचा मूलाधार आहे. सुवर्णाच्या या बहुमुखी उपयोगितेमुळे व मौलिकतेमुळे कोणत्याही गोष्टीचे मूल्यमापन करताना तिची सुवर्णाशी तुलना केली जाते. हाच नियम इतिहासालाही लागू पडतो. इतिहासातील एखादा कालखंड जेव्हा राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक क्षेत्रात उन्नतीचे शिखर गाठतो,सर्वांगीण उन्नतीद्वार इतर कालखंडापेक्षा स्वतःचे श्रेष्ठत्व सिद्ध करता त्या काळा सुवर्णयुगम् युवराजतील सर्व घटकांचा विकास गाठतो व्यक्ती आणि राष्ट्राचा सर्वांगीण विकास होऊन भौतिक व आध्यात्मिक विकासाचा समतोल राखला जातो. धर्म, वर्ण, वंश, प्रांत, भाषा इ. संकुचित वाद न पडून समाजात परस्पर सहकार्य आणि सामंजस्याचे वातावरण तयार होते, जेवा व्यक्ती, कुटुंब, गाव, जिल्हा, विभाग, राज्य या सवपिक्षा राष्ट्र मोठे ठरते व राष्ट्राप्रती समर्पणभाव निर्माण होतो तेव्हा सुवर्णयुग अवतरते. युगायुगातून जसा एखादाच महापुरुष जन्माला येतो तसेच युगायुगातून एखादेच सुवर्णयुग निर्माण होते. भारताच्या इतिहासाच्या प्राचीन काळात जेव्हा गुप्तकाळाचा जन्म झाला तेव्हा सर्व इतिहासकारांनी त्याचे बारसे करून एकमुखाने नामकरण केले 'सुवर्णयुग'

**गुप्तकालीन सुवर्णयुगाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत**

**१) राजकीय एकता -**

मौर्य साम्राज्याचा अस्त आणि गुप्तकाळाचा उदय (इ.स.पू. १८४ ते इ.स. २४०) या दरम्यानच्या सुमारे ४२५ वर्षांच्या कालखंडात भारतात एकही बलशाली केंद्रसत्ता नव्हती. संपूर्ण भारत लहान लहान राज्यांत विभागाला असून या राज्यात सतत चालणाऱ्या परस्पर संघर्षामुळे व हेव्यादाव्यामुळे भारत दुबळा बनता होता. संपूर्ण देशाचे लहान लहान तुकड्यात विभाजन होऊन व त्या लहान तुकडयांतीच स्थानिक जनता स्वतःची निष्ठा प्रकट करू लागल्याने राष्ट्रीय निष्ठेचा लोप होऊन राष्ट्रीय ऐक्याच्या भावनेला सुरुंग लागला होता. परकीय आक्रमकांनी याचा फायदा घेऊन या देशाला क्षतविक्षत करून टाकले. या देशाचे राष्ट्रीय ऐक्य अशा रीतीने विनाशाच्या काठावर उभे असताना गुप्त साम्राज्याचा उदय झाला. चंद्रगुप्त प्रथम, समुद्रगुप्त, चंद्रगुप्त विक्रमादित्य, स्कंदगुप्त या पराक्रमी गुप्त सम्राटांनी उत्तर व दक्षिण भारत एका छत्राखाली आणून या देशात ठाण मांडून बसलेल्या शक, कुशाण, पल्लव, हूण इ. परकीय शक्तींचा बंदोबस्त करून या देशाला एक विशाल साम्राज्य दिले. उत्कृष्ट प्रशासनाद्वारे या साम्राज्याला सुसंघटित करून गुप्तांनी या देशाला मौर्यानंतर प्रथमच राजकीय स्थैर्य व एकता प्रदान केली या देशात बलाढ्य हिंदूसाम्राज्य निर्माण झाले. सुवर्णाची चाहूल लागली.

**२) कल्याणकारी राज्य** –

गुप्तसम्राट महान पराक्रमी होते. साम्राज्याची संपूर्ण शक्ती त्यांच्या हाती एकवटली होती. असामान्य प्रतिभा आणि अमर्याद सत्ता माणसाजवळ असली की त्याची वृत्ती हुकूमशहाची बनते. या हुकूमशाही वृत्तीला संयमाचा बांध घालणे आवश्यक असते परंतु फार कमी राज्यकर्त्याजवळ हा संयम असतो. त्यामुळेच सर्वत्र सत्तेचा दुरुपयोग होताना दिसतो. गुप्तराजे मात्र याला अपवाद होते. थोडाफार भूप्रदेश सोडला तर आसेतुहिमाचल ते स्वामी होते. ते हुकूम असले तरी कल्याणकारी हुकूमशहा होते. प्रथम त्यांनी साम्राज्यातील निरनिराळ्या भूप्रदेशांना संघटित करून तेथे एकछत्री अंमल लागू केला. प्रजेला अंतर्गत बंडाळ्या व परकीय आक्रमणांपासून संरक्षण देऊन साम्राज्यात सुयोग्य प्रशासनाद्वारे शांतता व राजकीय स्थैर्य निर्माण केले. अनेक लोकोपयोगी योजना हाती घेऊन त्यांनी प्रजेला जास्तीत जास्त सुख देण्याचा प्रयत्न केला. सामान्यातील सामान्य माणसाला समाधानाने जगता येईल, त्याच्या न्याय्य हक्कांचे संरक्षण होईल अशी जास्तीत जास्त लोकांचे जास्तीत जास्त हित जोपासणारी प्रभावी शासन यंत्रणा गुप्तांची होती.

**३) आर्थिक समृद्धी**

राजकीय स्थैर्य कुशल प्रशासन, अंतर्गत शांतता व सुव्यवस्था यामुळे गुप्तकाळात देशांतर्गत व आंतरदेशीय व्यापार खूप भरभराटीला आला मध्यपूर्व तसेच आग्नेय आशिया आणि रोम, इजिप्त, इराण इ. देशांशी या काळात भारताचा व्यापार अतोनात वाढला. बाह्यदेशांतून सोन्याचा महापूर भारताकडे अविरत वाहत होता. त्यामुळे भारतात अनेक लहान मोठे व्यवसाय उदयाला आले. या व्यवसायांच्या श्रेणी आपापल्या व्यवसायांच्या हिताचे तर रक्षण करीतच परंतु त्याचबरोबर गोरगरिबांच्या कल्याणासाठीही अनेक योजना राबवीत. संपत्तीचा महापूर स्वतःबरोबर अनेक अपप्रवृत्तीचा गाळ वाहून आणत असतो. माणसाला एकदा सोनेरी नशा चढली की त्याच्या डोक्यात भौतिकवादाचे भूत वैमान घालू लागते. भौतिकवादाचा नंगानाच सुरू झाला की पायदळी तुडविली जातात आध्यात्मिक व सांस्कृतिक मूल्ये. परंतु गुप्तकाळात संपत्तीच्या महापुरासमवेत येणाऱ्या अपप्रवृत्तींच्या गाळाला देशाच्या आध्यात्मिक आणि सांस्कृतिक मूल्यांनी देशाच्या सीमेवरच थोपवून धरले त्यामुळे आर्थिक समृद्धीने या भूमीला अधिकच तेज चढले. आधीच सुजलाम, सुफलाम असलेली रूपयौवना भारतभूमी समृद्धीचा साज अंगावर चढल्यावर विष्णुपुरीची लक्ष्मी भासू लागली.

### ४) आचरण शुचिता व सद्गुण संपन्नता

गुप्तकाळात सर्व सुखे पायाशी लोळण घेत असतानाही सामान्यपणे लोकांचे आचरण पवित्र व धर्मयुक्त होते. प्रामाणिकपणा, दानशूरता, साधनशुचिता, पापभिरूता, सत्यवचन इ. गुण लोकांच्या अंगवळणी पडले होते. गुप्तकाळातील बहुसंख्य लोकांचा आहार सात्त्विक असून ते मांस, मद्य, कांदा, लसूण यांच्यापासून अलिप्त राहत. आहारातील सात्त्विकता त्यांच्या व्यवहारातही प्रतिबिंबित होत असे. सामान्य भारतीय हा सौम्य स्वभावाचा होता. त्याच्यात भांडखोर वृत्ती कमी असून धर्मानुसार आचरण करण्याकडे त्याचा कल असे.

### ५) हिंदू धर्माचे पुनरुज्जीवन

गुप्तसम्राट वैदिक धर्माचे पुरस्कर्ते होते. ते वैष्णव पंथाचे होते. हाच वैदिक धर्म पुढे हिंदू धर्म या नावाने ओळखला जाऊ लागला. बौद्ध धर्माच्या उदयानंतर भारतात वैदिक धर्माची पिछेहाट सुरू झाली होती. मौर्यकाळात बौद्ध धर्म केवळ भारतातच नव्हे तर भारताबाहेरही मोठ्या प्रमाणात पसरला होता. हा काळ वैदिक धर्माच्या अवनतीचा काळ होता. वैदिक धर्माच्या या अत्यंत नाजूक अवस्थेत गुप्तांनी या धर्माला केवळ राजधर्म म्हणूनच मान्यता दिली नाही तर या धर्माने भारतात गमावलेली प्रतिष्ठा परत मिळवून देण्यास तसेच भारताबाहेरही या धर्माचा प्रसार करण्यास मदत केली. या काळात वैदिक धर्मातील अनेक क्लिष्ट गोष्टींना फाटा देण्यात येऊन वैदिक धर्म जुनी कात टाकून नव्या झळाळीने पुढे आला. जुन्या परंपरा व यज्ञांना नवे सुटसुटीत रूप देण्यात आले.. जुन्या निसर्गदेवतांची जागा नव्या देवतानी घेऊन त्यांची मंदिरात प्रतिष्ठापना होऊ लागली. शैव आणि वैष्णव पंथाची अनेक मंदिरे बांधण्यात येऊन दोन्ही पंथ गुण्यागोविंदाने एकत्र नांदू लागले.राजे हिंदू धर्म असले तरी इतर धर्माच्या बाबतीत ते परमसहिष्णु होते गुप्तसाम्राज्यात प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या धर्माचे आचरण करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य होते. गुप्तरावे, ब्राह्मण, बौद्ध व जैन या तिन्ही धर्माकडे सारख्याच ममत्वाने पाहत. निरनिराळ्या धर्माचे लोक परस्परांच्या धार्मिक विचारांचे खंडण करण्याऐवजी एकमेकांच्या धार्मिक भावनाचा आदर करीत. प्रत्येक धर्माचा मार्ग शेवटी अंतिम सत्याकडे जातो ही लोकांची प्रामाणिक धारणा होती. परस्परांच्या धर्मातील चांगल्या गोष्टी स्वीकारून त्यांचे अनुकरण करण्याकडे लोकांची प्रवृत्ती होती. हिंदू धर्म हा मुख्यतच उदारमतवादी असल्याने शक, कुशाण, पल्लव इ. परकीयांना या काळात हिंदू धर्मात सामावून घेण्यात आले. या धर्माच्या सहिष्णू वृत्तीमुळेच परदेशातही अनेकांनी हा धर्म स्वीकारला गुप्तकाळ हा हिंदू धर्माच्या सृजन व संवर्धनाचा काळ होता. या काव्यात हा धर्म अधिक जोमाने फोफावला.

### ६) साहित्यातील बहर

गुप्तकाळ हा भारतीय साहित्याचा ऐन उमेदीचा काळ होय. या काळात साहित्यातील सर्व रंगांची भारतीय साहित्यात मुक्त उधळण होताना दिसते. संस्कृत भाषा ही एक तर एखाद्या कुशल नर्तकीप्रमाणे विलोभनीय पदन्यास करीत रसिकांच्या हृदयसिहासनावर हळूच विराजमान होताना दिसते. गुप्तराजे स्वतः विद्वान, रसिकराज व विद्वानांचे आश्रयदाते होते. त्यांनी संस्कृतला राजभाषेचा दर्जा देताच आतापर्यंत लकेच्या पार्वतीप्रमाणे भासणारी पार्वती अलकानगरीची यक्षिणी भासू लागली संस्कृतला दरबारी प्रतिष्ठा लाभताच साहित्यिकांच्या प्रतिभेला गगन ठेंगणे वाटू लागले. कालिदास, भास, विशाखादत्त, शूद्रक, भारवी, वसुबंधू, हरिषेण, दंडीन, आर्यभट्ट, वराही सहित्यिक, नाटककार, कवी, गणिती ज्योतिषाचार्य , याच्या भात्यातून एकाहून एक अमर अशा साहित्यिक कलाकृती बाहेर पडल्या. शाकुंतल, मेघदूत, मुद्राराक्षस, मालविकाग्निमित्र ऋतुसंहार किरातार्जुनीय नीतिसार, व्याकरण ग्रंथ इ. साहित्यांनी तत्कालीन जगाला तर वेड लावलेच परंतु आजही हे साहित्य जगात मान्यता पावलेले दिसते गुप्तकाळात अंतर्गत शांतता व सुव्यवस्था लाभल्याने साहित्यिकांनी पर्वणी साधली व भारतीय साहित्याच्या पानोपानी रत्न- माणकांची मुक्त उधळण केली. हिंदू, बौद्ध, जैन

वा तिन्ही धर्मातील साहित्यात या काळात अक्षर वाङ्मय निर्माण झाले म्हणूनच या काळाची तुलना इंग्लंडच्या एलिनावेद युगाशी आणि ग्रीसच्या पेरिक्लिज काळाशी केली जाते.

**७) वैज्ञानिक प्रगती**

गुप्तयुग हे वैज्ञानिक प्रगतीचे युग होय. या काळात भारताने गणित, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, चिकित्साशास्त्र, आयुर्वेद, ज्योतिषशास्त्र, खगोलशास्त्र, धातुविज्ञान इ. क्षेत्रात विलक्षण प्रगती केली. दशांश पद्धती, अंकगणित, बीजगणित, भूमिती यातील अनेक सूत्रांचा शोध या काळात लागला. नक्षत्रभ्रमणाची निश्चित दिशा व मार्ग आहे, पृथ्वी स्वतः च्या आसाभोवती फिरते, सूर्य व चंद्र ग्रहण राहु-केतुमुळे होत नसून पृथ्वी व सूर्य यांच्यामध्ये चंद्र आल्याने ग्रहण होते. इ. महत्त्वाचे वैज्ञानिक शोध या काळात लागले. आर्यभट्टासारखा गणितज्ज्ञ, वराहमिहीरसारखा ज्योतिषी, ब्रह्मगुप्त, चरक, सुश्रुत, पालकप्य, वाग्भट इ. संशोधक या काळात होऊन गेले. यामुळे प्राचीन काळी विज्ञानाच्या क्षेत्रात भारताला दिगंत कीर्ती लाभली.

**८) ललित कलांची प्रगती**

गुप्तयुग हे ललित कलांचे सुवर्णयुग होय. वास्तुकला, मंदिर निर्माण कला, चित्रकला, संगीत, मूर्तिकला इ. क्षेत्रात या काळात असामान्य कलाकृती निर्माण झाल्या कानपूरजवळील भितारी येथील विटांचे मंदिर, झाशी जिल्ह्यातील देवगड येथील मंदिर यांचे शिल्प अप्रतिम आहे. अजिंठा व बाघ येथील बौद्धविहार, चैत्यगुहा, स्तूप इ. म्हणजे वास्तुकला व स्थापत्यकलेतील मूर्तिमंत काव्य होय. या काळातील हिंदू देवतांच्या, बुद्धांच्या, तीर्थकरांच्या मूर्ती म्हणजे जणू सजीव पुतळेच अजिंठा लेणीतील चित्रकला पाहून आजही मन आश्चर्याने थक्क होते. या ललित कलांचे वैशिष्ट्य म्हणजे त्या शुद्ध भारतीय आहेत.

**९) हिंदू साम्राज्यवाद आणि भारतीय संस्कृतीचा प्रसार** –

गुप्तकाळात भारतात विशाल हिंदूसाम्राज्य निर्माण झाले. या साम्राज्याने सागर उल्लंघून आग्नेय आशियात स्वतः च्या वसाहती निर्माण केल्या भारतातून अनेक विद्वान, तत्त्वज्ञ, धर्मप्रचारक, व्यापारी, शिक्षक भारताबाहेर गेले व त्यांनी भारताबाहेरील देशांशी राजकीय, धार्मिक व सांस्कृतिक संबंध स्थापन केले. त्यामुळे चंपा, कंबोडिया, मलाया, जावा, सुमात्रा, बोर्नियो, बाली, इंडोचीन इ. भागांत भारतीय धर्म, भाषा, साहित्य, सामाजिक परंपरा, प्रशासनव्यवस्था, ललितकला यांचा प्रसार झाला आजही १५०० वर्षांनंतर या भागात भारतीय संस्कृतीची दाट छाप दिसते. आग्नेय आशियातील लोकांच्या नावावरूनही ही गोष्ट स्पष्ट होईल. भारताच्या बाहेरही अनेक भारतीय राजवंश स्थायिक झाले व त्यांनी तेथे दीर्घकाळ राज्य केले. अशा रीतीने हिंदू साम्राज्यवाद व भारतीय संस्कृतीचा सर्वदूर प्रसार झाला.

गुप्तकाळात देशाची जीवनाच्या सर्वच क्षेत्रात लक्षणीय प्रगती झाली हे आतापर्यंतच्या विवेचनावरून लक्षात येईल. देशाची अशी सर्वांगीण प्रगती त्यापूर्वी किवा त्यानंतर कधीही झाली नाही. हा काळ भारताच्या इतिहासातील सर्वात देदीप्यमान कालखंड होय. म्हणूनच या गुप्तयुगाला भारताच्या इतिहासातील सुवर्णयुग म्हणतात